डोअरस्टेप स्कूल

दादा परांजपे अभ्यासिका,

तपोभूमी हौसिंग सोसायटी,दत्तवाडी, पुणे

अहवाल २००४-२००५

प्रस्तावना

डोअरस्टेप स्कूल ची शाखा म्हणून दत्तवाडी परिसरात दि. १ सप्टेंबर २००२ रोजी दादा परांजपे अभ्यासिका या नावाने या शाखेची सुरवात करण्यात आली. या अभ्यासिकेत बाल वाचनालय, मोठयांचे वाचनालय, अभ्यास वर्ग, संगणक वर्ग, चित्रकला वर्ग, दहावी मार्गदर्शन वर्ग, इ.उपक्रम घेतले जातात. सुरवातीला अभ्यासिका ६तास चालवण्यात येत होती. त्यानंतर मुलांची वाढती संख्या व मुलांच्या मागणी नुसार अभ्यासिका दिवसातून १४ तास चालवण्यात आली. व १ फेब्रुवारी २००४ पासून अभ्यासिका सकाळी ८.३० ते रात्री ९.३० या वेळेत १३ तास चालवली जाते. व रविवारी ८.०० ते १२.०० या वेळेत चार तास चालवली जाते.परिक्षेच्या दिवसात मुलांच्या मागणी नुसार रविवारी ८ तास चालवली.

<u>अभ्यास वर्गाची माहिती</u>

दत्तवाडी परिसरातील बहुतेक मुलांचे पालक साक्षर नसल्यामुळे ते घरी अभ्यास घेऊ शकत नाहीत तसेच आजुबाजुचे वातावरण अभ्यासाला पुरक नसल्यामुळे ती घरी अभ्यास करत नाहीत अशा मुलांचा मुळ पाया पक्का करून घेण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला जातो. या मुलांच्या त्यांच्या क्षमतेनुसार पातळया ठरवल्या जातात. त्यानुसार प्रत्येक मुलाचा अभ्यास घेतला जातो. तसेच प्रत्येक महिन्याला त्यांची पातळी बघितली जाते. हया पातळया संस्थेकडून ठरविल्या गेल्या आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक महिन्याला नोंद ठेवली जाते. याचा फायदा मुलांची प्रगती समजण्यास तसेच पालकांशी चर्चा करण्यास होतो.

इ १ ली, २ री, ३ री चे सकाळी १ व दुपारी ३ असे ४ अभ्यासवर्ग चालवले.

एकूण दाखल व एकूण गळतीचा तक्ता

इयत्ता	एकूण दाखल	एकूण गळती	नियमित येणारी
१ली	१६	०७	९
२री	१०	३	७
३री	३५	२०	१५
एकूण	६१	३०	३१

वरिल तक्त्यावरून असे दिसून येते की यावर्गांचा लाभ घेणारे एकूण लाभार्थी ६१ आहेत. नियमित येणाऱ्याची संख्या ३१ आहे.व गळती झालेली संख्या ३० आहे. यामध्ये ९ मुलांचा वर्ग बंद केल्यामुळे गळतीचे प्रमाण जास्त दिसते.

४७ लाभार्थींच्या गळतीची कारणे पुढील प्रमाणे

गळतीची कारणे	१ ली	२री	३री	एकूण
कंटाळा करतात.	१	२	१	४
लांब राहत असल्याने येण्याचा कंटाळा करतात	१	१	५	७
पालक लक्ष देत नाही.	४		४	८
घरगुती कारणामुळे पालक पाठवत नाही.				
वस्ती सोडून गेले				
दुसरी शिकवणी लावली	१		१	२
विशेष वर्गाकरिता गेले				
वर्ग बंद १५/९/०४			९	९
एकूण	७	३	२०	३०

तसेच नियमित असणाऱ्या लाभार्थींची संख्या ३१ आहे त्यांची उपस्थिती पुढील प्रमाणे

उपस्थिती चा तक्ता

उपस्थिती दिवसांमध्ये	इयत्ता	एकूण

	१ली	२री	३री	
१०० +	६	५	९	२०
५१ ते १००	२	२	६	१०
१ ते ५०	१			१
एकूण	९	७	१५	३१

क्षमता चाचणी घेण्याची पध्दत

क्षमता चाचणी सर्व मुलांची प्रत्येक महिन्याच्या शेवटी लेखी व तोंडी दोन्ही पध्दतीने घेतली. काही वर्गामध्ये सर्व मुलांची एकदम लेखन पध्दतीने घेतली त्याच प्रमाणे काही वर्गामध्ये लेखन व वाचन हे वैयक्तीत घेतले. एकदा गणिताचा पेपर दिला होता. त्यातील प्रश्न पाठयपुस्तकावर आधारीत होते.

नियमित असणाऱ्या ३१ मुलांची

पातळया/हजर दिवस	सुरवातीची पातळी	शेवटची पातळी			
		१००+	५० ते१००	१ ते ५०	एकूण
पूर्व तयारी	8				
मुळाक्षरे अपूर्ण	1	1		1	2
बाराखडी अपूर्ण	10				
जोडाक्षर अपूर्ण	12	4	2	1	7
जोडाक्षरे पूर्ण		14	7	1	22
एकूण	31	19	9	3	31

अभ्यासिका व संदर्भ वाचनालय

दत्तवाडी परिसर व आजुबाजुच्या वस्ती मधिल वातावरण अभ्यासास योग्य नसल्यामुळे तसेच अभ्यासाकरिता शांत व पुरेशी जागा नसल्यामुळे व त्यांची सर्वप्रकारची पुस्तके खरेदी करण्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे शांत जागा तसेच गाईड्स, अपेक्षित, डिक्शनरी, इनमाय पॉकेट, शब्दार्थ या प्रकारची एकूण ३७४ पुस्तके उपलब्ध आहेत याचा लाभ २०१ मुलांनी घेतला.

बाल वाचनालय

मुलांना शालेय पुस्तकांव्यतिरीक्त इतर चांगली पुस्तके वाचावयास मिळावी त्यांना अवांतर वाचनाची सवय लागावी या करिता गोष्टिची पुस्तके हे चांगले साधन आहे. या करिता वाचनालय चालवले जाते यामध्ये 657 गोष्टिची पुस्तके आहेत. यामध्ये मुलांना आवडणाऱ्या गोष्टिंच्या पुस्तकांचाच समावेश केलेला आहे. यामध्ये जादूच्या गोष्टी, रंगतदार गोष्टी, प्राणी व पक्ष्यांच्या गोष्टी, तसेच पंचतंत्रातील गोष्टी या प्रकारच्या गोष्टींची पुस्तके उपलब्ध आहेत. या पुस्तकांचा लाभ घेणारे 50 लाभार्थी आहेत. मुलांना प्राणी पक्ष्याच्या गोष्टी, जादुच्या गोष्टी, पंचतंत्रातील गोष्टी. साहसी कथा, या प्रकारच्या गोष्टी वाचायला जास्त आवडतात.यामध्ये इ २ री ते 9 वी पर्यंतचे वाचक आहेत.

मोठयांचे वाचनालय

पालकांच्या मागणी नुसार १ जानेवारी २००३ ला वाचनालय चालू केले.या मध्ये बाबा कदम,सुहास शिरवळकर,पु.ल.देशपांडे,रणजित देसाई, या सारख्या विवीध लेखकांची एकूण २०१ पुस्तके आहेत.

आठवडयातून तीन वेळा पुस्तके बदलता येतात.

उपक्रम व पुस्तकांची संख्या

उपक्रम	पुस्तकांची संख्या
संदर्भ वाचनालय	३७४
बाल वाचनालय	६५७
मोठयांचे वाचनालय	२०१

उपक्रम व लाभार्थी संख्या

उपक्रम	लाभार्थी		
	M	F	Total
संदर्भ वाचनालय	१२३	७८	२०१
बाल वाचनालय	३२	१८	५०
मोठयांचे वाचनालय		१४	१४

संदर्भ वाचनालयातिल इयत्ते प्रमाणे लाभार्थि पुढिल तक्त्यात दाखवलेले आहेत.

संदर्भ वाचनालय

इयत्ता	एकूण दाखल		एकूण
	मुले	मुली	
१ ली ते ४ थी	११	११	२२
५ वी	१२	११	२३
६ वी	१५	१६	३१
७ वी	६	१०	१६
८ वी	१८	९	२७
९ वी	१८	८	२६
१० वी	३७	१३	५०
इतर	६		६
एकूण	१२३	७८	२०१

बाल वाचनालयात असणारे लाभार्थि व त्यानी वाचलेल्या पुस्तकांची संख्या.

बाल वाचनालय

पुस्तके वाचली	मुले	मुली	एकूण
१ ते ५	२	०	२
६ ते १०	१	०	१
११ ते १५	३	०	३
१६ ते २०		२	२
२१ ते २५	१	०	१
२६ +	२५	१६	४१
एकूण	३२	१८	५०

मोठयांच्या वाचनालयात असणारे लाभार्थि व त्यानी वाचलेल्या पुस्तकांची संख्या.

मोठयांचे वाचनालय

पुस्तके वाचली	मुली
१ ते ५	६
६ ते १०	५
११ ते १५	२
१६ +	१
एकूण	१४

शिकवण्याची पध्दत

१) कोणती नाविन्यपूर्ण पध्दत वापरली?

विदयाताईंच्या ट्रेनिंग मध्ये जी साधनतयार केली ती वेगवेळया पध्दतीने वापरली. अक्षरावरून चालणे सुतळीने अक्षर तयार करने,रांगोळीने अक्षर तयार करणे,अक्षरांवर डाळ चिटकवणे

२) शैक्षणिक साहित्यांचा वापर केला का? कसा?

शैक्षणिक साहित्यांचा वापर जास्त प्रमाणात केला. मुळाक्षरेशिकवण्यासाठी मुळाक्षरे शोधणे, स्मरणखेळ,चित्रावर चित्राचे पहिले अक्षर ठेवणे,सारखेवेगळे ओळखा,पाहूणा ओळखा,मग,कर,वर असे शब्द तयार करणे.अक्षराला गोल करणे, न पाहता लिहणे,वाचणे समानअर्थाचे शब्द व उलट अर्थाचे शब्दांचे कार्ड लावणे,वाचणे,

४)सेंटरवर कोणते साधनसाहित्य तयार केले?

फळाफुलांच्यानावाचे कार्ड,बेरीज वजाबाकींच्या गणितांच्या चिठया,घडयाळांचे चार्ट,अर्धा पाव पाऊणचे चार्ट

३) मुलांना काणत्या शैक्षणिक कृतीत जास्त रस होता किंवा मुलांनी परत दयावीअशी मागणी केली?

उत्तर- मुळाक्षरे शोधून लावणे, गोल करणे, शब्द तयार करणे,

६) पाठयपूस्तकांचा किती वापर केला?

मुलांना चांगले लिहिता वाचता येऊ लागली प्रश्नाची उत्तरे लिहिता वाचता येऊ लागली.तेव्हा मुलांना पाठयपुस्तके आवडू लागली. परिक्षेच्या वेळी पुस्तकांचाजास्त वापर केला.

.७)पाठयपुस्तकांबरोबर इतर पुस्तकांचा देखिल वापर केलाका?कसा?

होय,डोअर स्टेप स्कुलची पुस्तके इतर वाचनासाठी वापरली गोष्टींच्या पुस्तकांचा वापर वाचनासाठी व गोष्ट सांगण्यासाठी केला. तसेच जोडाक्षरांचे शब्द शोधण्यासाठी गोष्टींची पुस्तके दिली.तसेच डोअर स्टेप च्या जोडाक्षराच्या पुस्तकाचा वापर जोडशब्द शिकवण्यासाठी झाला.

फी चा अहवाल २००३-२००४

क्रमांक	उपक्रम	अपेक्षित फी	जमा फी	
१	अभ्यास वर्ग	४४६०	१२४५	
२	संदर्भ वाचनालय	४85०	१७००	
३	बाल वाचनालय	६५५	३८०	
४	मोठयांचे वाचनालय	9४०	66०	
	एकूण		४९७०	

पालकसभा

आम्ही दर महिन्याला पालकसभा घेतली. पालकसभेत पालकांना मुलांच्या प्रगती विषयी माहिती सांगितली. पालकांची मते जाणुन घेतो. तसेच पालकांना येण्यास सांगतो. फी विषयी देखील बोलतो. पालकसभेला या अशी विनंती करतो.

विशेष उपक्रम 2004 ते 2005

दिनांक	उपक्रम	सहभागी मुले
	Work with French Vol.	
२३/१२/०४	सहल	६२
३१/१२/०४	चकाचक सिनेमा	६०
७/१/०५	स्पोर्ट डे/ क्रिडादीन	
२०/२/०५	निबंध स्पर्धा	२०

९ जुलै २००४ ते ३१ जुलै या दिवसात फ्रेंच व्हॉलेंटियर आले होत. सोमवार ते शुक्रवार ते दररेज १० ते५ काम करायचे आमच्या सेंटरवर ५ व्हॉलेंटियर आले होते ओद,कॅमी,निकोल,मार व समी अशी त्यांची नावे होती त्यातील दोघी स्टूडंट आहेत. व तिघे सव्हिस करतात. आमच्या सेंटरवरील काम अवघड होते आणि व्हॉलेंटियर मध्ये चार मुली व एक मुलगा होता. परंतू त्यानी हॉलच्या मागील जागेत वाढलेली झाडे तोडून तेथील सर्व कचरा साफ केला. त्यांनी तोडलेली झाडे व गवत कचरापेटीत टाकण्यास त्याना मुलांनी मदत केली. दोन लेबरच्या मद्तीने मैदानाची लेव्हल केली. त्यासाठी संदर्भच्या मुलांनीही मदत केली.तसेच त्याच मुलांच्या मद्तीने मैदानावर झाडे लावली. तसेच हॉलच्या बाजूला शेड बांधली त्या सर्व व्हॉलेंटियरनी भिंतीची कड रंगवली व भितीवर वेगवेगळी चित्रे काढली. त्यांनी तोडलेली झाडे व गवत कचरापेटीत टाकण्यास त्याना मुलांनी मदत केली. स्टडी क्लासच्या मुला-मुर्लीची चित्र रंगवण्याची ॲक्टीव्हिटी घेतली तसेच ती रंगवलेली पाने फळे कार्ड शिटवर एक मोठे झाड काढले व त्यावर ती सर्व चित्रे मुलांनी चिकटवली. ते झाड रंगवण्याची पध्दत आम्हाला खूपच आवडली कारण स्पंजाच्या स्हाय्याने एवढे मोठे झाड पटकन रंगवून झाले. व्हॉलेंटियरनी हॉल सजवला व नंतर संदर्भच्या सर्व मुलांचे एकत्र येऊन वेगवेगळे खेळ घेतले. व त्या सर्व मुलांना बक्षिसे दिली. ते झाड भिंतिला चिकटवले आहे प्रत्येक चित्रावर नावे लिहिलेली असल्यामुळे मुले त्याचे अजूनही निरिक्षण करतात. तसेच साफ केलेल्या जागेचा उपयोग मुले खेळण्यासाठी तसेच अभ्यासाला बसण्यासाठी करतात. शेड मध्ये काही वेळा वर्ग घेतला जातो.

१)नागपंचमीचा सण असल्यामुळे मुलांकडून शिक्षिकेच्या मदतीने मातीचे नाग तयार करून घेतले.व त्या दिवशी नागाची माहीती सर्व मुलांना सांगितली. मुर्लीनी नागपंचमीची गाणी म्हटली व त्या गाण्यावरील खेळ खेळले (फुगडी,झिम्मा) हे सर्व झाल्यानंतर सर्व मुलांना लाहया व साखर फुटाणे हा खाऊ दिला.या कार्यक्रमात रेणूका व कर्वे इन्स्टिटयूटच्या शोभा व विणा या सहभागी झाल्या.

२)संदर्भच्या मुलांना रविवारी ॲनाकोंडा व हॅरीपॉटर हे चित्रपट दाखवले.

३)५/९/०४ मुलांनी शिक्षक दिन साजरा केला.शिक्षक दिनाच्या दिवशी इ.३री च्या मुर्लीनी इ.१ली व इ.२री च्या मुलांना शिकवले.

४)७/९/०४ मंगळवार रोजी दहीहंडी सर्व मुलांनी साजरी केली या मुलांनी दहीहंडी सुंदर सजवून नंतर सरिता नावाच्या मुलीनी हि दहीहंडी फोडली दहीहंडीच्या या कार्यक्रमात ५० च्या वर मुले आली होती मुर्लीनी गाणी म्हटली व नंतर सर्व मुलांना पोहयाचा प्रसाद दिला.

५)२५/१०/०४ या दिवशी भोंडला साजरा केला सकाळची वर्गाची मुले २२ व संध्याकाळच्या वर्गाची मुले ३८ अशी एकूण ६० मुलांनी भाग घेतला मुर्लीनी भोंडल्याची गाणी म्हटली व सर्वाना खिरापत म्हणून भेळ हा खाऊ दिला

६)५/११/०४ या दिवशी अभ्यास वर्गाच्या सर्व मुलाना चार्ली चापलीन चा चित्रपट दाखवला

७)१४/१२/०४ मंगळवार या दिवशी २री ते ६वी पर्यंतच्या २० मुलांना लायन्स क्लब तर्फे गणेशकला क्रिडामंच येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी ७ ते २ या वेळेत रिक्षेने(६०रू) नेले होते मुलांना कार्यक्रम फारसे आवडले नाही कारण ते इंग्लीश मध्ये होते थोडे सांस्कृतीक कार्यक्रम आवडले.त्यानी नाश्ता व जेवण दिले.

८)२३/१२/०४ गुरूवार या दिवशी कमलानेहरू पार्क येथे ९ ते १२ या वेळेत १९ मुले व तीन शिक्षिका यांची सहल नेली होती. मुलांकडून प्रत्येकी १०रू घेतले. १६ मुलांनी पैसे दिले. प्रवास खर्च व खाऊ मिळून २२० रू खर्च झाले. जास्तीचे ६० रू ऑफिस कडून घेतले.

९) २४/१२/०४ शुक्रवार या दिवशी कमला नेहरू पार्क येथे दुपारी २.४५ ते ५.१५ या वेळात ४३ मुलीना सहलीला नेले.६ शिक्षिका बरोबर होत्या. मुलींकडून प्रत्येकी १० रू घेतले ४२ मुलींचे पैसे जमा झाले. प्रवास खर्च व खाऊ मिळून ४७० रू खर्च झाले जास्तीचे ५० रू ऑफिस कडून घेतले

१०) ३१/१२/०४ शुक्रवार या दिवशी संदर्भ व स्टडी क्लास मिळून ६० मुलांना व तीन शिक्षिकांना प्रभात थिएटर येथे चकाचक हा सिनेमा सकाळी ९ ते १२ या वेळेत दाखवला रमा ताईच्या ओळखीने श्री.भिडे साहेब यांनी स्पॉन्सर केला होता .सिनेमा बघून आल्यानंतर काही मुलांनी मिळून एक गट स्थापन केला व प्लॅस्टिकच्या पिशव्या असे एका कागदावर लिहून वर्तमानपत्राच्या पिशव्या बनवून प्रत्येक पिशव्यमध्ये ती चिठ्ठी टाकून ती पिशवी प्रत्येकाच्या घरी नेऊन दिली.

११)७/१/०५ शुक्रवार या दिवशी सकाळ व दुपार या दोन्ही विभागांचा क्रिडादिन झाला.यामध्ये ६५ मुलांनी सहभाग घेतला. ३० मुलांना बक्षिसे देण्यात आली.(डबा,क्रेऑनकलर, वॉटर बॅग)
लिंबू चमचा लंगडी संगित खुर्ची व बॉल पाडून बाटल्या पाडणे हे खेळ घेतले.

१२)१४/१/०५ ते १५/१/०५ या दिवशी मुलांचा गट किंवा सहभाग या विषयावरती वर्कशॉप झाले या वर्कशॉपमध्ये १९ लोकांनी सहभाग घेतला.

१३)११/२/०५ शुक्रवार या दिवशी तिळगुळ समारंभ केला.जवळपास असे राहणारे पाच पालक येऊन गेले.

१४) १८/२/०५ योगासन वर्गासाठी विजय आला होता.

१९/२/०५ इ.१०वी च्या संदर्भच्या मुलांची मार्च ९७ च्या बीजगणित या विषयाची परीक्षा घेतली.

१५) २०/२/०५ संदर्भच्या मुलामुलींची निबंध स्पर्धा घेतली.व २० मुले सहभागी झाली.

चित्रकला वर्ग :–मुलांना चित्र काढायला खुप आवडते हे लक्षात आल्यावर जुलै महिन्यात चित्रकला वर्ग सुरू करण्यात आला.त्यामध्ये मुलांना वेगवेगळया प्रकारची चित्र काढण्यास शिकवली .ग्लास पेंटीग,चेहरा,भाजी मंडई,तसेच खेडयात असणाऱ्या टपरीचे चित्र काढण्यास शिकवले आणि मुलांनी ती चित्र अत्यंत सुंदर काढली.

<u>भेटदिलेल्या व्यक्ती</u>

१) फ्रेंच व्हॉलेंटिअर्स (मार,समी,ओद,कॅमी,निकोल) – दत्तवाडी हॉल च्या मागिल जागेतिल गवत व झाडे तोडून जागेची सफाई करण्यासाठी व ग्राऊंडची लेव्हल करण्यासाठी. (मुलांना खेळण्यासाठी)
२) आन (जारग्ज योन,(हायस्कुल) डुलुज,फ्रान्स) – सेंटर ची माहिती
३) शोमा व विणा स्टुडंट कर्वे इन्स्टीटयुट – सेंटर ची माहिती
४) प्रकृती मल्होत्रा फयुचर सेन्स ली. लंडन – सेंटर ची माहिती
५) प्रा. शहाजी ढेकणे (महाराष्ट्र राज्य दृक श्रवण शिक्षण संस्था)
६) अमृता देव (व्हॉलेंटिअर) Coral Draw
७) परिक्षित मोरे (व्हॉलेंटिअर) English Grammer
८) ख्रिस्तलिना – मागील जागेचे निरीक्षण
९) सेसिली (विशेष वर्ग पहाणी/चौकशी)
१०)महादेव शहारा ट्रस्टचे सदस्य (पुस्तक खरेदी)
११) पाचगणी संजिवनट्रस्ट शाळा वाचनालय व डोअरस्टेप ची माहिती
१२)श्री विनय अवस्थी, रणजीत गाडगीळ, हेमाताई (मॅडम बरोबर चर्चा)

दत्तवाडी सेंटरची सध्याची स्थिती
जुन 2004/ मे 2005

उपक्रम	दाखल मुले	गळती मुले	नियमित असणारी मुले
अभ्यासवर्ग इ१ ली	16	7	9
इ.२री	10	3	7
इ.३री	35	16	15
संदर्भ वाचनालय	201		201
बाल वाचनालय	50		50
मोठयांचे वाचनालय	14		14

संगणक वर्ग	102		102
२री विशेष अभ्यास वर्ग	55	7	48
एकूण	483	33	446

Time Table

DOOR STEP SCHOOL

Dada paranjpe Abhyasika

Dattawadi pune

Timing : Monday to Saturday 8.am to 9.30pm (13 hours)
Sunday 8.00 to 12.00 am (4 hours)

Activity	Time
Reference library (13 Hours Monday to Saturday & Sunday 4 Hours)	8.30 am to 9.30 pm
Childrens library (Monday wednesday, Friday & Sunday 4 Hours)	8.30 am to 9.30 pm
Adult library (Monday, Wednesday, Friday)	8.30 am to 9.30 pm
Special Study Class for 2nd Std.	10.30 am to 11.30 am 11.00 am to 12.00 am 12.30 pm to 1.30 pm 3.00 pm to 4.00 pm
Study Class (for 1st & 2nd Std)	10 am to 12 am
Study Class (for 1st & 2nd Std)	4 pm to 6 pm
Study Class (for 3rd Std)	1 pm to 3 pm
Computer Classes	7 am to 9 pm 5.30 pm to 9.30 pm
Drawing Class (Once day in week on Saturday)	8.oo pm to 9.oo pm